# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)
दूरध्वनी क्रमांक - ०२५३/२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल केलेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.५६५०/२०२२/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.संजय कारभारी कुटे<br>रा.कुटे मळा, मु.पो.बेलतगव्हाण,<br>ता.जि.नाशिक ४२२ ४०१. | सहाय्यक प्रशासन अधिकारी,<br>पंचायत समिती, नाशिक.<br>ता.जि.नाशिक. | गटविकास अधिकारी (उ.श्रे.),<br>पंचायत समिती, नाशिक.<br>ता.जि.नाशिक. |

## विवेचन

अपिलार्थी यांनी उपरोक्त द्वितीय अपिलातील दि.०८/०४/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये "गटविकास अधिकारी डॉ. सारीका बारी यांनी चार्ज घेतल्यापासून पंचायत रमिती येथे त्यांचे अधीनस्त शासकीय वाहन लॉगबुकाच्या नोंदवहीच्या फिरत्या दौ-याच्या माहिती मिळावी. तसेच त्यांच्या दैनंदिन रजिस्टर नोंदवहीच्या सत्य माहिती मिळावी. तसेच पं.स. यांनी ग्रा.पं. बेलतगव्हाण पाठवलेले पत्र क्र.पंसना/ग्रापं/तक्रार/१२५, दि.२४/०३/२०२२ या पत्रावर गटविकास अधिकारी यांनी काय चौकशी केली व काय अहवाल सादर केला त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी" अशी माहिती मागितली आहे. सदर द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दि.१०/१२/२०२४ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे आदेश पारित केले होते.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी."

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार देखील अपिलार्थी यांना कोणतीही माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. तसेच आयोगाच्या उपरोक्त नमूद आदेशाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी आयोगाकडे अद्यापपर्यंत कोणताही लेखी खुलासा सादर केल्याचे दिसून येत नाही. याव्यतीरिक्त प्रथम अपिल निर्णयाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक यांनी श्री.राजेश आहेर, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती, नाशिक यांनी समजदिल्याचे दिसून येते मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी काहीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. यावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर प्रकरणी त्यांचे

काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये शास्तीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांच्याविरुध्द आयोगाच्या मते उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभूमीवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) अन्वये रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक यांनी त्यांच्या वेतनातून समान २ मासिक हप्त्यांत कपात करुन सदर रकमेचा भरणा **"००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८९)"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.५६५०/२०२२/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नाशिक ता.जि.नाशिक.

---

जावक क्र. 3238 दिनांक :- 06/05/2026